आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ एप्रिल २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- नव्या वक्फ कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी
- आगामी सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची शिफारस
- ग्राहक किंमत निर्देशांकांवर आधारित महागाई दर ६ वर्षातल्या नीचांकी पातळीवर
- २४ कॅरेट सोन्याचे दर पहिल्यांदाच ९७ हजारांच्या पलीकडे, चांदी १ लाखाच्या उंबरठ्यावर

**आणि**

- भविष्यातल्या आजाराच्या साथींकरता जगाला सज्ज करण्यासाठीच्या करारावर WHO च्या सदस्य देशांमध्ये सहमती

**<><><><><>**

नव्या वक्फ कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयानं आज कोणताही हंगामी आदेश जारी केला नाही. या कायद्याविषयी सर्वोच्च न्यायालयानं उपस्थित केलेल्या तीन मुद्यांवर आपला युक्तिवाद तयार करण्यासाठी केंद्रसरकारनं अधिक वेळ मागून घेतल्यामुळे या प्रकरणाची सुनावणी आता उद्या होईल.

या कायद्याला आवाहन देणाऱ्या याचिकांवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या पीठानं आज सुनावणी घेतली.

ज्या मालमत्तांना न्यायलयानं वक्फ म्हणून जाहीर केलं आहे. त्या कायदेशीर व्यवहारानं असोत किंवा वहिवाटीनं वक्फ मालमत्ता असोत,

त्यांना बेदखल करता येणार नाही, असं न्यायालयानं सांगितलं. वहिवाटीनं मालमत्ता असलेल्या वक्फच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्र बहुतेकांकडे असणार नाहीत, त्यांना बेदखल कसं करता येईल, असा सवाल न्यायालयानं सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केला. सदर मालमत्ता ही सरकारी जमीन आहे का? याबाबत जिल्हाधिकारी चौकशी करत असताना तिचा वक्फ म्हणून विचार केला जाणार नाही अशी तरतूद नव्या कायद्यात आहे, ती लागू होणार नाही, असा आदेश आपण देऊ असं न्यायालयानं सांगितलं. वक्फ मंडळामधे आणि केंद्रीय वक्फ समितीमधे पदसिद्ध सदस्य वगळता इतर सर्व सदस्य मुस्लीम असतील, असा आदेशही आपण देऊ, असं न्यायालयानं सांगितलं. त्यावर सरकारनं युक्तिवादासाठी वेळ मागून घेतल्यामुळे हंगामी आदेश आज जारी झाला नाही, आणि शेवटी उद्या सुनावणी सुरु ठेवण्याचा निर्णय न्यायालयानं घेतला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये युक्रेनमधल्या परिस्थितीसह दोन्ही देशांशी संबंधित प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली. दोन्ही देशांमधल्या विविध क्षेत्रांमधल्या सहकार्याबरोबरच क्वांटम, ५जी-६जी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सायबर सुरक्षा क्षेत्रामधल्या भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठीच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार यावेळी केला. फिनलँड हा युरोपियन युनियन मधला महत्वाचा भागीदार देश असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी भारताचे पुढील सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची शिफारस केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे केली आहे. गवई सध्या सर्वोच्च न्यायालयाचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती खन्ना १३ मे रोजी सेवानिवृत्त होणार आहे. मंत्रालयाच्या मंजुरीनंतर न्यायमूर्ती गवई हे भारताचे ५२ वे सरन्यायाधीश होतील.

<><><><><>

हरियाणातल्या जमीन व्यवहारात झालेल्या कथित मनी लाँड्रिंग प्रकरणी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांची आज सलग दुसऱ्या दिवशी सक्तवसुली संचालनालयाने चौकशी केली. नवी दिल्लीत ईडीच्या कार्यालयात त्यांना प्रश्न विचारण्यात आले.  हे प्रकरण वाड्रा यांच्या कंपनीने गुरूग्राममधे खरेदी केलेल्या जमीनीशी संबंधित आहे.

<><><><><>

नॅशनल हेराल्ड प्रकरणी ईडीनं सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यासह इतरांच्या विरोधात आरोपपत्र दाखल केल्यावर काँग्रेसनं ठिकठिकाणी निदर्शनं केली. काँग्रेस नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यावर राजकीय सुडबुद्धीने ईडीची कारवाई करुन नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे.

हे राजकीय प्रकरण नसून भ्रष्टाचाराचं आहे. काँग्रेस खालच्या पातळीचे राजकारण करत असल्याचा आरोप माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केला आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या मुर्शीदाबाद इथं झालेल्या हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगानं चौकशी समितीची स्थापना केली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती मुर्शीदाबादमधल्या हिंसाचारग्रस्त भागांना भेट देईल, तसंच जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांशी चर्चा करेल.

<><><><>

गेल्या आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई दर ४ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. गेल्या ६ वर्षातला हा निचांकी दर आहे. गेल्या महिन्यात हा दर ३ पूर्णांक ३४ शतांश टक्के राहिला. ऑगस्ट २०१९ पासूनचा हा सर्वात कमी मासिक दर आहे. अर्थ मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती दिली आहे.
दरवाढीला आ ळा घालतानाच अर्थिक वाढीला चालना देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचं प्रतिबिंब या आकडेवारीतून दिसतं, असं सांगत, यासाठी रिझर्व्ह बँकेनं बजावलेल्या भूमिकेची प्रशंसा अर्थ मंत्रालयानं केली आहे.

<><><><>

दररोज उच्चांकी पातळी गाठण्याची चढाओढ सोन्या-चांदीच्या दरात आजही कायम राहिली. त्यामुळं सोनं आणि चांदी आज सुमारे दीड हजार रुपयांनी महाग झालं. मुंबईच्या बाजारपेठेत २४ कॅरेट सोनं ९७ हजार ४१७ रुपये तोळा, २२ कॅरेट सोनं ९५ हजार रुपये तोळा, तर चांदी सुमारे ९९ हजार ५०० रुपये किलो दराने मिळत होती.

भारतीय वायदे बाजारात सोन्यानं पहिल्यांदाच ९५ हजार रुपयांची पातळी ओलांडली. अमेरिकी वायदे बाजारात पहिल्यांदाच सोन्याचे दर ३ हजार ३०० डॉलर प्रति औंस या दराच्या पलीकडे गेले आहेत.

<><><><><>

भारत-उझबेकिस्तान लष्करातील संयुक्त सराव हा दोन्ही देशांत विश्वास आणि सहकार्य निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा आहे, असं प्रतिपादन ब्रिगेडियर एस तलूजा यांनी केलं. दोन्ही देशांचा दस्तलिक हा संयुक्त सराव आजपासून पुण्यात सुरू झाला, त्यावेळी ते बोलत होते.२८ एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या सरावात दोन्ही देशांचे प्रत्येकी ६० जवान सहभागी झाले असून, लष्कर आणि हवाई दलाचा यात सहभाग आहे. उझबेकिस्तानच्या लष्करी तुकडीचे प्रमुख कर्नल जबारोव थोईर इर्गासोविच यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

माध्यम आणि मनोरंजन तंत्रज्ञान क्षेत्रातल्या स्टार्टअप्ससाठीच्या वेव्हेक्स २०२५ या मंचात सहभागी होण्यासाठीची कालमर्यादा आणि पात्रता मर्यादा वाढवण्याचा निर्णय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं घेतला आहे. २०१६पासून सुरू झालेले स्टार्टअप्स आता वेव्हेक्ससाठी अर्ज करू शकतात. तसंच अर्जासाठीची शेवटची तारीखही २१ एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे. वेव्ह्ज परिषदेअंतर्गत वेव्हेक्स या उपक्रमातल्या पात्र स्टार्टअप्सना गुंतवणूकदारांपुढे सादरीकरण करायची संधी मिळेल. हा कार्यक्रम २ मे रोजी होणार आहे.

<><><><><>

भविष्यातल्या आजाराच्या साथींकरता जगाला सज्ज करण्यासाठी WHO अर्थात जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्य देशांना एका ऐतिहासिक कराराला आज अंतिम स्वरुप दिलं. या दृष्टीनं तीन वर्षांपेक्षा जास्त काळ बोलणी सुरु होती. नियमन, परवाना करार, आणि अनुकूल वित्तीय शर्तींद्वारे तंत्रज्ञानाच्या हस्तांतराला प्रोत्साहन देण्याचं आवाहन या करारात केलं आहे. कोणतंही हस्तांतर परस्पर सहमतीनंच झालं पाहिजे, असं त्यात म्हटलं आहे.

पॅथॉजन एक्सेस अँड बेनिफिट शेअरिंग सिस्टम अर्थात साथीच्या आजारांशी संबंधित माहिती आणि जीवशास्त्रीय साहित्याचं जलद सुव्यवस्थित आणि वेळेत देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यवस्था स्थापन करण्यासारखी अनेक पावलं या कराराच्या मसुद्यात समाविष्ट आहेत. पुढच्या महिन्यात जागतिक आरोग्य परिषदेत या प्रस्तावांवर विचार होईल.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने चिनी वस्तूंच्या आयातीवर २४५ टक्क्यांपर्यंत अतिरीक्त आयात शुल्क लागू करण्याची घोषणा केली आहे.

हे शुल्क युद्ध अमेरिकेनं सुरू केलं आहे. चीनने लादलेले कर हे संपूर्णतः वाजवी आणि कायदेशीर आहेत, असा दावा चीननं केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेने लावलेल्या आयातकराच्या प्रत्युत्तरात हाँगकाँगने अमेरिकेला जाणारी टपाल सेवा स्थगित केली आहे. येत्या २ मे पासून हाँगकाँगमधून येणाऱ्या टपाल पार्सलांवर अमेरिकेचं आयात शुल्क लागू होणार असल्यानं ते

शुल्क अमेरिकेच्या वतीने वसूल न करता टपाल स्वीकारणंच बंद करण्याचा निर्णय हाँगकाँगने घेतला आहे.

<><><><><>

राज्यात सीबीएसईच्या धर्तीवर नवीन अभ्यासक्रम लागू करण्याचा शासन आदेश आज जारी झाला. या शैक्षणिक वर्षापासून पहिलीसाठी, पुढच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि ६वीसाठी, २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पाचवी, सातवी, ९वी आणि ११ वीसाठी तसंच २०२८-२९ ला इयत्ता ८ वी, दहावी आणि बारावीसाठी CBSE अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधे हिंदी भाषा अनिवार्य असेल. तर अन्य माध्यमांच्या शाळांमधे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी अभ्यासक्रमाच्या भाषेशिवाय मराठी आणि इंग्रजी या भाषा अभ्यासल्या जातील.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ८ षटकात २ बाद ६० धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//